# पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी इतिवृत्त

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गट नं. २१/१ ते २१/६, कुमठे, पोस्ट - टिकेकरवाडी, तालुका- उत्तर सोलापूर, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित आधुनिकीकरण व विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार २,५००/टन ०.प्रतिदिन पासून ७,५००/टन ०.प्रतिदिन पर्यंत, मळीवर आधारित आसावणी प्रकल्प क्षमता २०.० किलोलिटर/दिन वरुन १००.० किलोलिटर/दिन पर्यंत आणि प्रस्तावित नविन सहविद्युत निर्मिती प्रकल्प - ३८.० मेगावॅट क्षमतेपर्यंत संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत

संदर्भः- १) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार.

२) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक १४-०९-२०२० चे निर्देश.

३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे क्रं.बी-२००९१७-एफटीएस-००८२, दिनांक १७-०९-२०२० चे निर्देश.

-------------

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गट नं. २१/१ ते २१/६, कुमठे, पोस्ट - टिकेकरवाडी, तालुका- उत्तर सोलापूर, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित आधुनिकीकरण व विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार २,५०० ०. /टनप्रतिदिन पासून ७,५००/टन ०.प्रतिदिन पर्यंत, मळीवर आधारित आसावणी प्रकल्प क्षमता २०.० किलोलिटर/दिन वरुन १००.० किलोलिटर/दिन पर्यंत आणि प्रस्तावित नविन सहविद्युत निर्मिती प्रकल्प - ३८.० मेगावॅट क्षमतेपर्यंत संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी वार- गुरुवार, दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी सकाळी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती .

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-७० ,व्दारा पत्र क्रं/बीओ.जेडी/पीएच/डब्लुपीसी/बी-२०१२०३-एफटीएस-०१२३ दिनांक ०३ डिसेंबर, २०२० अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सोलापूर

श्री प्रशांत भोसले, प्रभारी, उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, सोलापूर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली (संदर्भ क्रं. २ वरिलप्रमाणे) व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई (संदर्भ क्रं. ३ वरिलप्रमाणे) दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष जनसुनावणी (Virtual Public Hearing) आयोजित करण्यात आलेली असून बैठकीच्या सत्रात १०० व्यक्तींना परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास व्यक्तींना पुढील सत्रात बैठकीत संधी देण्यात येईल. सर्व उपस्थितांना जनसुनावणीत सहभागाची संधि देण्यात येईल असे सांगितले. त्यांनी

उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर सभागृहात प्रवेश करताना करण्यात आलेला आहे. बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

समन्वयक यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली .

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री. भोसले यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गट नं. २१/१ ते २१/६, कुमठे, पोस्ट - टिकेकरवाडी, तालुका- उत्तर सोलापूर, जिल्हा -

सोलापूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित आधुनिकीकरण व विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार २,५००/टन ०.प्रतिदिन पासून ७,५०० ०. /टनप्रतिदिन पर्यंत, मळीवर आधारित आसावणी प्रकल्प क्षमता २०.० किलोलिटर/दिन वरुन १००.० किलोलिटर/दिन पर्यंत आणि प्रस्तावित नविन सहविद्युत निर्मिती प्रकल्प - ३८.० मेगावॅट क्षमतेपर्यंत संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये अन्वये संवर्ग ५ (जे), ५ (जी), व १ (ड) मध्ये मोडत असल्याने त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे .प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची

परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक ०३-१२-२०१८ रोजी त्यास मान्यता (अटी व शर्ती - Terms of Reference) देण्यात आली .

सदरहू जनसुनावणी ही दिनांक ०४-११-२०२० रोजी आयोजित करण्यात आलेली होती, त्यानुसार पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ व दैनिक संचार या वृत्तपत्रात दिनांक ०३-१०-२०२० रोजी पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. मात्र शिक्षक व पदवीधर मतदार संघ निवडणूक, २०२० आचारसंहिता लागू झाल्याने सदरहू पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी पुढे ढकलण्यात आली.

त्यानंतर माननीय जिल्हादंडाधिकारी, सोलापूर यांच्या पूर्व परवानगीने जनसुनावणी ही बुधवार ०९-१२-२०२० रोजी आयोजित करण्यात आली. त्यानुसार दिनांक ०८-११-२०२० रोजी ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ व दैनिक संचार या वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. मात्र काही अपरिहार्य कारणांमुळे दिनांक ०९-१२-२०२० रोजीची सुनावणी ही १०-१२-२०२० रोजी आयोजित करण्यात आली. त्यासंबंधीची स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ व दैनिक संचार या वृत्तपत्रात पर्यावरण विषयक

जाहीर लोकसूनावणी सूचना दिनांक २६-११-२०२० रोजी प्रकाशित करण्यात आली.

त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते .

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय,सोलापूर मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर, तहसीलदार, तहसील कार्यालय- दक्षिण सोलापूर, जिल्हा - सोलापूर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर, तालुका - दक्षिण सोलापूर,जिल्हा - सोलापूर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उत्तर सोलापूर, तालुका - उत्तर सोलापूर,जिल्हा - सोलापूर, ग्रामसेवक / सरपंच, ग्रामपंचायत, कार्यालय-, मौजे कुंभारी, कुमठे, शिंदखेड, मद्रे,

होटगी, होटगी स्टेशन, सावतखेड, हत्तुर, फताटेवाडी, चंद्रनाळ, वडकबाळ, समशापूर, नंदूर, आहेरवाडी, मुळेगाव, येतनाळ, तालुका - दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूर, तालुका - उत्तर सोलापूर, जिल्हा - सोलापूर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर, व मप्रनि मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. समन्वयक यांनी असे सांगितले की स्थानिक मंडळ सोलापूर कार्यालयास एक लेखी आक्षेप व प्रकल्पस पाठिंबा असलेले एक लेखी निवेदन प्राप्त झालेली असून संबंधितांना सुनावणीच्या वेळी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. समन्वयक यांनीउपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. श्री भोसले यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा अध्यक्षांना केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पास एकूण ४०४.३५ कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून प्रकल्प प्रवर्तकांनी सीईआर योजनांसाठी दरवर्षी दहा कोटी रुपये फंड म्हणून रोखून ठेवणार आहे.

सादरीकरणानंतर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही आक्षेप, सूचना नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री संजय थोबडे, कारखाना माजी संचालक,राहणार-बाळी वेस, तालुका-उत्तर सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-**

त्यांनी सांगितले की ते सदरहू कारखान्याचे माजी संचालक असून माझे वडिल सदरहू कारखान्याचे संस्थापक सदस्य (founder member) आहेत. ते म्हणाले की सादरीकरणात प्रस्तावित प्रस्तावित हा सारखा उल्लेख आलेला आहे. तो पूर्णपणे चुकीचा आहे. गेले पाच वर्षे हा प्रकल्प परवानगी न घेताना चालू/कार्यरत आहे. आपण कार्यरत प्रकल्पाची जनसुनावणी घेण्यास उपस्थित आहात, ही सर्वात दुर्दैवाची बाब आहे. सदरहू प्रकल्पास नियमांचे उल्लंघन केल्याने प्रकल्प बंद (closure notice) करण्याऐवजी जनसुनावणीचा फार्स करता व प्रस्तावित प्रकल्प म्हणत आहात. चिमणीस इंग्रजी शब्द स्टॅक वापरून परिसरातील १० कि.मी.चे सर्वेक्षण केले असे सादरीकरणात सांगता, तर प्रकल्पास लागून असलेले विमानतळ आपणास लक्षात येत नाही का? आपण जिल्हाधिकारी कार्यालयातून आलेला आहात. जिल्हाधिकारी कार्यालयात याबाबत तक्रार केलेली असून ही बेकायदेशीर चिमणी

उभारलेली आहे व बेकायदेशीर चिमणीच्या संदर्भात जी सुनावणी आयोजित केलेली आहे, तर आपण न्यायालयाचा अपमान करत आहात, संविधानाचा अपमान करत आहात असे जिल्हाधिकारी, सोलापूर यांना पत्र दिलेले असतानाही जिल्हाधिकारी, सोलापूर हे अतिरिक्त जिल्हाधिकारी यांना येथे पाठवतात ह्याच्या एवढी देशाला दुर्दैवाची व काळीमा फासणारी घटना नसेल.

दुसरी गोष्ट ही चिमणी बेकायदेशीर आहे. त्यामुळे हा सर्व प्रकल्पही बेकायदेशीर आहे. त्याची तुम्ही सुनावणी घेत आहात.

यावेळी अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे स्पष्टीकरण दिले की जिल्हाधिकारी हे जिल्हादंडाधिकारी असतात व निवासी उप जिल्हाधिकारी हे अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी असतात. जनसुनावणीस अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी अध्यक्ष म्हणून हजर राहू शकतात. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संजय थोबडे यांना आक्षेप नोंदविण्याच्या सूचना केल्या व त्यांना कायद्याची बाजू पहाण्याचे आश्वासन दिले.

श्री संजय थोबडे म्हणाले की ही संपूर्ण बाब ही बेकायदेशीर असून मी त्याचा निषेध व्यक्त करतो. या जनसुनावणीच्या इतिवृताची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी. मी सुप्रीम कोर्टात न्यायालयाचा अपमान झाल्यामुळे आपल्या विरुध्द दावा नोंदविणार आहे. मी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जिल्हा प्रशासन व प्रकल्प प्रवर्तक यांच्याविरुध्द दावा लावणार आहे. तरी मला जनसुनावणीच्या इतिवृत्तांची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी येथे उपस्थितांना त्यांच्या काही सूचना वा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. त्यावेळेस त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांच्या कार्यकारी संचालकांना श्री थोबडे यांच्या आक्षेपांवर स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकांचे कार्यकारी संचालक यांनी स्पष्टिकरण देताना सांगितले की आताच श्री थोबडे यांनी आक्षेप नोंदविला की हा प्रस्तावित प्रकल्प नसून पूर्ण झालेला प्रकल्प आहे. तरी याबाबत माहिती देताना सांगितले की या प्रकल्पाची याअगोदर जनसुनावणी झालेली आहे. ती सुनावणी २०१७ मध्ये झालेली आहे. त्या सुनावणीत वाहतुक व्यवस्थापन (Traffic Management) यावर शंका उपस्थित करण्यात आला व त्यावेळच्या वाहतुक व्यवस्था (Traffic Management) मुद्यावर प्रकल्प प्रवर्तकांना पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी प्राथमिक अटी व शर्ती (ToR - Terms of Reference) प्रदान करण्यात आला. शहरात हा कारखाना असल्याने वाहतुक व्यवस्था (Traffic Management) मुद्यावर त्यावेळेस जनसुनावणीत उपस्थित करण्यात आलेल्या शंकाचे निरसन करुन आजच्या जनसुनावणी सामोरे जात आहोत.

प्रकल्प प्रवर्तक यांनी पुढे सांगितले की श्री थोबडे यांनी आक्षेप नोंदविला आहे की हा प्रकल्प पूर्ण उभारणी झालेला आहे. याबाबत प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जरी हे सत्य असले तरी येथे तीन वर्षांचे स्पष्टीकरण देऊ इच्छितो की आपला प्रकल्प ही २,५०० टीसीडीचा आहे. २०१७-२०१८ ला आपले ऊसाचे गाळप (sugar crushing) ७,४५,००० झालेले आहे. २०१८-२०१९ ला ६,४५,०००

झालेले आहे.  २०१९-२० ला ३,५७,००० झालेले आहे. २०१७-१८ ला ३.८३ KWA , २०१८-२०१९ ला ५.६५ व २०१९-२०२०  ला २.५० पटीने निर्यात झालेली आहे. म्हणजे २,५००० टीसीडीचा प्रकल्प १६० दिवस कार्यान्वित झाल्यानंतर जी  आकडेवारी क्षमता आहे, जर हा प्रकल्प ७,५०० टीसीडीचा केला व चालवला तर बारा लाख चौदा लाख ऊसाचे गाळप झालेले पाहीजे. ते न करता त्याची पुरेपुर काळजी घेण्यात आलेली आहे.  त्यात उल्लंघन किंवा बेकायदेशीर काही केले असे  वाटत नाही.

त्याचप्रमाणे चिमणीचा जो विषय उपस्थित केला, तर चिमणी व विमानतळाबाबत केंद्र शासनाच्या विविध विभागांशी चर्चा चालू असून या बैठकीत जो मुद्दा करण्यात आला, तर येथे कुठलाही निर्णय होत नाही. ज्यावेळी मुंबईला विमानतळ प्राधिकरणाशी चर्चा होईल, त्यावेळी उपस्थित केलेल्या आक्षेपांची नोंद घेण्यात येते.  तरी याबाबत न बोलणे योग्य होईल.   परंतु हा प्रस्तापित प्रकल्प आहे.

यावेळी श्री थोबडे यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की एक बरे झाले, आपण प्रकल्प चालू आहे याची कबूली दिली.  मात्र चर्चा शासनाच्या विविध विभागाशी चालू आहे हे धादांत खोटे कशाला बोलता.  तीन वेळा माननीय जिल्हाधिकारी यांनी

अवर सचिव, महाराष्ट्र शासनास पत्र पाठविले आहे की उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता सदरहू चिमणीच्या बांधकामास स्थगिती देणे योग्य होणार नाही. आता अजून किती सुनावणी घेणार आहात.  मुंबई हाय कोर्टाने बेकायदशीर ठरविले, सुप्रीम कोर्टाने बेकायदेशीर ठरविले. याच्यासारखा लाजीरवाणी बाब नाही.

२) <u>श्री चंद्रकांत शंकर कुलकर्णी, राहणार-कुंभारी, तालुका - दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-</u>

श्री चंद्रकांत शंकर कुलकर्णी यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की कुंभारीतून एमआयडीसीत जाताना नाल्याला जे घाणपाणी येते, त्याबद्दल कोणी काहीही बोलत नाही. मी रोज येताना बघतो, सर्व पाण्यात फेस येत असतो. त्याकडे कोणीही बोलत नाही, आणि आपल्याकडे बगॅसवर आधारित सहविद्युत प्रकल्प आहे. कोळसा वीजनिर्मितीसाठी वापरला, तर परत तयार होत नाही. चंद्रपूर याठिकाणी वीजनिर्मितीसाठी कोळसा वापरला जातो. ऊस तोडल्यावर त्यापासून साखर, मळी तयार होते. बगॅसही होतो. बगॅसवर वीज निर्माण करता येते. आपला सहविद्युत प्रकल्प हा बगॅसवर आधारित आहे. तर आसवणीसाठी बायोगॅस प्रकल्प आहे. त्याचप्रमाणे शेतक-यांना खत मिळत आहे. येथे ऊसपीकाची उपलब्धता भरपूर आहे. पाऊसही भरपूर होत आहे. त्यामुळे ऊस गाळप क्षमता ही १०,००० टीसीडी करायला पाहिजे. सर्व सभासदांचा कारखाना व्यवस्थापनावर विश्वास आहे.

तरी मी पर्यावरणविषयक जाहिर सुनावणी समितीस विनंती करतो की सदरहू प्रकल्पास मान्यता देऊन शेतकरी, कामगार यांना न्याय द्यावा.

३) <u>**श्री अशोक रेवनसिंद बिराजदार, राहणार-कुंभारी, तालुका - दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-**</u>

मी या कारखान्याचा सभासद असून ऊस उत्पादक सभासद आहे. माझी शेती कारखान्यापासून १/२ कि.मी. अंतरावर आहे. या कारखान्यामुळे ३५,००० सभासदांचे व कामगारांचे भविष्य उज्ज्वल झालेले आहे. कारण हा दुष्काळी भाग होता. मात्र या कारखान्याने आमचे भविष्य उज्जवल केलेले आहे. आमची मुले शिकून मोठमोठ्या पदावर गेलेले आहेत. या कारखान्यामुळे कुठलाही धोका किंवा प्रदूषणाचा त्रास या

परिसराला नाही. मात्र विमानतळासाठी प्रकल्पातील चिमणीचा धोका आहे, हे पटत नाही. कितीतरी विमाने येतात व जातात. एक बाजू मांडून बोलणे हे चुकीचे आहे. आपण जर सर्वेक्षण केले तर ३५,००० सभासदांमधील ३४,९९९ सभासद होकार देतील. जे झाले, ते योग्य आहे. प्रकल्पाआधी किती बेकारी होती, आता स्थानिकांना किती फायदा झाला ह्याचा विचार करावा. सहविद्युत प्रकल्पामुळे, आसवणी प्रकल्पामुळे किती लोकांना नोक-या मिळाल्या याचा विचार करावा. कामगारांच्या व सभासदांच्या किती मुलांना किती नोक-या मिळाल्या, हे पहावे. आज पंतप्रधान म्हणतात बेकारी कमी करायची आहे. आपण म्हणता चिमणी पाडा. मग बेकार होणा-या लोकांचे काही नियोजन केलेले आहे का? जर असा काही प्रयत्न जरी झाला, तर सर्व ३५,००० सभासद त्यास विरोध करतील.

४) <u>श्री संजय थोबडे, कारखाना माजी संचालक,राहणार- बाळी वेस, तालुका - उत्तर सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-</u>

यांनी परत आक्षेप नोंदविताना मत मांडले की सभासदांचे प्रश्न उपस्थित केल्याबद्दल धन्यवाद. श्री थोबडे म्हणाले की हा ३५,००० शेतक-यांचा कारखाना आहे, तसा तो माझाही आहे. मी येथे संचालक होतो, माझे वडिल संचालक होते, माझी आई संचालक होती, माझा भाऊ संचालक होता व आजही माझा चुलतभाऊ संचालक आहे. मी कारखान्याचा वैरी नाही. मी कारखान्याचा हितचिंतकच आहे. बेकायदेशीर चिमणी बांधण्याचे जे पाप ज्यांनी केले, त्यांच्या माथी ते मारा, तुमच्या माथी ते मारू नका. आता प्रश्न ३४,००० सभासदांचा आहे, तर जरी चिमणी पाडली, तरीही हा आपला कारखाना चालूच राहणार आहे. तो जुन्या चिमणीवर चालू शकतो. जे बेकायदेशीर काम केले, ते सर्व सभासदांना भरून द्यायला पाहिजे. तरी जे कोणी हे काम केले, त्याच्याकडून

३४,९९९ सभासदांनी वसूल केले पाहिजे. आपला कारखाना सुंदर चालवून दाखवू. तुम्ही मनात शंका बाळगण्याचे काहीही कारण नाही.

त्याचप्रमाणे ३४,९९९ चा विचार करताना आपणास सोलापूरच्या १५ लाख लोकांचा विचार करावा लागणार आहे. कारण विमानतळ आला, तर मोठमोठ्या कंपन्या येतील. स्थानिकांना आणि हजारो लोकांना रोजगार मिळेल. त्याचाही विचार व्हावा. विचार एकाकी करु नये. संपूर्ण विचार करावा.

येथे परत अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी येथे उपस्थितांना त्यांच्या काही सूचना वा आक्षेप असल्यास त्या तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन केले.

**५) श्री जे.बी.संगेवार,प्रादेशिक अधिकारी,मप्रनि मंडळ,पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सदरहू प्रकल्प हा झेडएलडी (शून्य द्रव निःस्सारण) असेल असे सांगितले. तर झेडएलडीसाठी काय करणार आहात? साखर, आसवणी, सहविद्युत प्रकल्प यांची संपूर्ण माहिती द्यावी. ज्यावेळी आपण संपूर्ण प्रकल्प झेडएलडी म्हणतो, तर त्याचा संपूर्ण तपशील तीन्ही प्रकल्पाचा देणे योग्य होते.

प्रकल्प प्रवर्तकाचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की ७,५०० टीसीडीचा ऊस गाळप प्रकल्प आहे, त्यात पाणी व्यवस्थापन करुन अतिरिक्त २०% कन्डेन्सेट पाणी रोज उपलब्ध होणार आहे. ते अतिरिक्त कन्डेन्सेट पाणी तसेच ऊसात जे ६५% ते ७०% पाणी असते, त्या पाण्यामुळे प्रक्रियेला लागणारे पाणी पूर्ण वापरुन प्रत्येक टनाला २० मेट्रिक टन अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे. ते पाणी

आपण सी.पी.यु. मध्ये त्याच्यात जे साखर उत्पादनात ऑरगॅनिक बाबी असतील ते बाजूला करुन ते सीपीयुतील अतिरिक्त कन्डेन्सेट पाणी आपण आसवणी प्रकल्पासाठी वापरणार आहोत. त्यामुळे आसवणी प्रकल्पासाठी आपणास अतिरिक्त शुध्द पाण्याची गरज पडणार नाही.

त्याचप्रमाणे उत्पादन प्रक्रियेत जी सांडपाण्याची (स्पेंट वॉश) निर्मिती होते, ती प्रति लिटर अल्कोहोलच्या ६-७ लिटर स्पेंट वॉशची निर्मिती होते, कारण आपली बॉटम पध्दतीची आधुनिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा कार्यान्वित राहणार आहे. ते ६-७ लाख लिटर प्रति दिवस उत्पन्न् होणारा स्पेंट वॉश पाच स्तरामध्ये (फाईव्ह स्टेज) आपण इव्हॅपरेटर बसविणार, ते स्पेंट वॉश ५०% कमी (concentrate) होईल. त्या स्पेंट वॉशला बायोमिथिनाझेशन करणार असून त्यातून मिथेन गॅस बाजूला करणार. तो मिथेन गॅस व राहिलेला स्पेंट वॉश, त्या स्पेंट वॉशची कॅलिरोबिक व्हॅल्यु ही जवळजवळ १२०० किलो कॅलिरोबिक इतकी असते. तो १२०० किलो कॅलिरोबिकचा स्पेंट वॉश व त्यातून काढलेले गॅस यावर दोन्ही इंधनावर इन्सिनरेशन बॉयलर चालविणार आहोत. त्या बॉयलरच्या वाफेवर आपण आसवणी प्रकल्प कार्यान्वित करणार आहोत. त्यामुळे आसवणी प्रकल्पातील कुठलेही सांडपाणी औद्योगिक सांडपाणी सनियंत्रण यंत्रणेकडे जाणार नाही. आसवणी प्रकल्पात कन्डेन्सेट केलेल्या पाण्याचा आपण आसवणी प्रकल्पातच पुनर्वापर करणार आहोत. साखर प्रकल्पातील जर जलाशय भरुन घेतला तर तीन्ही प्रकल्प म्हणजे साखर, आसवणी व सहविद्युत प्रकल्प कार्यान्वित करुन हंगाम संपल्यावरही कमीतकमी पाच कोटी लिटर पाणी शिल्लक राहू शकेल. सहविद्युत प्रकल्प असा

असतो, तेथे पाण्याचा वापर सर्वात जास्त असतो. आपण आपल्या सहविद्युत प्रकल्पात एअर कुल्ड कन्डेन्सेट घेत आहोत. त्याला पाण्याची गरज भासत नाही. हवेपासून आपण कन्डेन्सेट करतो. त्यामुळे सहविद्युत प्रकल्पात अतिरिक्त पाण्याची गरज लागणार नाही.

येथे सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आक्षेप नोंदविला की साखर कारखान्यात जे सांडपाणी निर्माण होईल, त्याबाबत आपण काहीही उल्लेख केलेला नाही. त्याचे स्पष्टीकरण द्यावे.

प्रकल्प प्रवर्तकांचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की निर्देशांप्रमाणे प्रति १०० मे. टन ऊसाच्या १००.० लिटर सांडपाणी निर्मिती होते. अतिशय आधुनिक पध्दतीची औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करणार आहोत. ते प्रक्रिया केलेले सांडपाणी कारखान्याच्याच २५ हेक्टर क्षेत्रात हरित पट्टा विकसित केलेला आहे, त्यात वापरणार आहोत. आताही तेथील झाडांना प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरण्यात येते. नविन प्रकल्पासाठी आपण तेथे नविन ५०,००० झाडे लावण्याचे नियोजन आहे. त्यास कारखान्यातील प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरणार आहोत.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की ह्याला झेडएलडी म्हणत नाही. आपण सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते पाणी झाडांना वापरू शकतात. त्यासाठी आपणास रिव्हर्स ऑस्मोसिस (आर.ओ.) कार्यान्वित करावाच लागेल. प्रकल्प प्रवर्तकांनी सदरहू सयंत्रणा कार्यान्वित करण्याची हमी दिली.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आर.ओ. रिजेक्टसाठी काय करणार, त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आर.ओ. रिजेक्टचे पाणी कुलिंगसाठी वापरु. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी त्यात हाय टीडीएस राहिल. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आमच्याकडे ओपन टाईप रोलर असतात. तेथे आम्हांला सर्क्युलेटींग कुलींग पाणी लागते. तेथे पाण्याचा प्रत्यक्ष संबंध येत नाही, तेथे वापरता येईल. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी त्यावेळी महाराष्ट्र शासनाची तज्ज्ञ समिती (एससीएसी) काय निर्णय घेईल त्याप्रमाणे करावे अशी सूचना केली.

६) **श्री एच.मधुबाबू, सामाजीक पर्यावरण कार्यकर्ता, रुरल एनव्हायरमेंट एज्युकेशन एन्ड हेल्थ अवरनेस सोसायटी, हैद्राबादः-**

त्यांनी सांगितले की सिध्देश्वर कारखाना विस्तारिकरण करत असून मी २-३ लेखी सूचना केलेल्या आहेत. त्याचा विचार व्हावा. त्यांनी लेखी निवेदन पर्यावरण समितीस दिले.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत माहिती सांगितली की ह्या जनसुनावणीच्या अनुषंगाने स्थानिक उप प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, सोलापूर यांना हरकत अर्ज सोलापूर विकास मंच, बी-६, मधुमालती, शिवाजी हौसिंग सोसायटी, सोलापूर ह्यांच्याकडून प्राप्त झालेला असून त्यात दहा हरकतीचे मुद्दे आहेत. समन्वयक यांनी सर्व नऊजणांची नांवे वाचून दाखविली.

७) दुसरी लेखी सूचना ही रुरल एनव्हायरमेंट एज्युकेशन एन्ड हेल्थ अवरनेस सोसायटी, हैद्राबाद यांच्याकडून बैठकीत प्राप्त झालेली असून त्यांनी विस्तारिकरणास पाठिंबा दर्शविलेला आहे.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू हरकत अर्ज आणि प्रकल्पास पाठिंबा असलेले निवेदन अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना वाहतुक योजना (Traffic Plan) दिलेला आहे काय याबाबत प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना विचारणा केली व कोणी विचारणा केल्यास स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी काही आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता. त्यावेळी समन्वयक यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याची इतिवृत्तात नोंद घेण्यात येणार आहे. प्राप्त लेखी सूचना, अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व इतिवृत्त महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मुंबई येथील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्थानिकांनी बैठकीत उपस्थित राहून सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे, प्रकल्प अधिकारी व शासकीय अधिकारी यांचे आभार

मानले व अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी संपुर्ण झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी बैठक संस्थिगत करण्यात आली.

प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा असलेली ०१ पत्रे/सूचना व प्रकल्प विस्तारिकरणास आक्षेप असलेली ०१ पत्रे सोबत जोडलेली आहेत.

| | |
|---|---|
| **श्री. प्रशांत भोसले ,** | **श्री.जे. बी. संगेवार ,** |
| समन्वयक, | सदस्य, |
| पर्यावरणविषयक जाहिर | पर्यावरणविषयक जाहिर |
| जनसुनावणी समिती | जनसुनावणी समिती |
| तथा | तथा |
| प्रभारी, उप प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी, |
| मप्रनि मंडळ, सोलापूर | मप्रनि मंडळ, पुणे |

Ajeetdeshmukh

**श्री. अजित देशमुख ,**

**अध्यक्ष**

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती

तथा

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सोलापूर

जिल्हा- सोलापूर